**पिक सरंक्षण :** मूग पिकावर रस शोषणाऱ्या किडी आणि केसाड अळीचा प्रादुर्भाव होतो त्यांच्या नियंत्रणासाठी किनाल फॉस २५% प्रवाही १००० मिली ५०० लिटर पाण्यातून फवारावे. तसेच या पिकांवर प्रामुख्याने भूरी व पिवळा विषाणू या रोगाचा प्रादुर्भाव आढळून येतो. भूरी रोगाच्या प्रादुभार्वमुळे पिकाच्या खालील पानांवर पांढरे टिपके आढळून येतात व पिवळा विषाणू या रोगाचा प्रसार पांढरी माशी या कीडी मार्फत होतो. या रोगाच्या नियंत्रणासाठी पाण्यात मिसळणारे गंधक १२५० ग्रॅम किंवा ५०० ग्रॅम कार्बेन्डेंझीम ५०० लिटर पाण्यातून प्रति हेक्टरी फवारावे.

**काढणीः** मूगाच्या शेंगा ७५ टक्के वाळल्यानंतर पहिली तोडणी व त्यानंतर ८-१० दिवसानी राहिलेल्या सर्व शेंगा तोडाव्यात शेंगा खळ्यावर चांगल्या वाळल्यावर मळणी करावी.

**उत्पादनः** मूग पिकाची चांगल्या प्रकारे काळजी घेवून वाढविलेलाय पिकापासून मूगाचे १२ ते १५ क्विंटल हेक्टरी उत्पादन मिळते.



प्रति : १००० म.फु.कृ.वि./विस्तार प्रकाशन/घडिपत्रिका/क्र.२१९७/२०१८

**प्रकाशक**
डॉ. किरण कोकाटे
संचालक, विस्तार शिक्षण,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

**अर्थ सहाय्य**
प्रकल्प संचालक,
आत्मा धुळे

**सह-संपादक**
डॉ. पंडित खर्डे
प्रभारी अधिकारी प्रसारण केंद्र,
म.फु.कृ.विं., राहुरी

**संपादक**
डॉ. पंकज पाटील
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र, धुळे

# मूग उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान







**लेखक**

श्री. जयराम म. गावित
प्रक्षेत्र व्यवस्थापक
कृषि विज्ञान केंद्र, धुळे

श्री. काथेपूरी जगदीश
शास्त्रज्ञ (कृषिविद्या)
कृषि विज्ञान केंद्र,धुळे

श्री. रोहित व्हि. कडू
शास्त्रज्ञ (उद्यानविद्या)
कृषि विज्ञान केंद्र,धुळे

प्रति : १००० म.फु.कृ.वि./विस्तार प्रकाशन/घडिपत्रिका/क्र.२१९७/२०१८

महात्मा फुले कृषि विद्यापीठ
**कृषि विज्ञान केंद्र,**
कृषि महाविद्यालय, धुळे-४२४००४
दुरध्वनी क्रं. (०२५६२)२३०३६२
संकेतस्थळः http://www.kvkdhule.org
*E-mail* : pckvkdhule@gmail.com
pckvkdhule@rediffmail.com

# मूग उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान

खरीप हंगामामध्ये खालोखाल मूग पीक महत्वाचे मानले जाते. गेल्या अनेक वर्षापासून मुगचे दर वाढत असल्याने मूग फार फायदेशीर ठरतो. त्यासाठी योग्य जातीची लागवड करावी.

मूग पीक ७० ते ७५ दिवसात पक्व होते. त्यामूळे थोड्याशा पावसाचा देखील लाभ होवू शकतो पीक पद्धतीसाठी हे पीक अतिशय महत्वाचे असल्यामूळे चांगले उत्पन्न मिळते.

**जमिन :** मध्यम ते भारी, चांगली निचरा होणारी जमीन निवडावी. क्षारपड पाणथळ तसेच उतारावरील हलक्या जमीनीत लागवड करू नये. अशा जमीनीत मूळावर रायझोबीयम जीवाणूंच्या गाठीची वाढ होत नाही परिणामी रोपे पिवळी होवून मरण पावतात.

**योग्य वाणांची निवड :** खरीप मूगाकरीता बी.एम.२००३-२, बी.एम २००२-१, वैभव पी.के.व्ही (ग्रीन गोल्ड), उत्कर्ष या जातीची निवड खरीप हंगामात लागवडीसाठी करता येईल.

**पूर्वमशागत :** उन्हाळ्यापूर्वी जमीन नागंरावी, चांगली तापू दयावी आणि पावसाळा सुरु होताच कुळवाच्या पाळया द्याव्यात. काडी कचरा, धसकटे वेचून घ्यावीत. याच वेळी हेक्टरी ५ टन चांगले कुजलेले शेणखत घालावे.

**पेरणीची वेळ :** खरीप हंगाम मूगाची पेरणी जूनचा पंधरवाड्यामध्ये पेरणी पूर्व करावी. पेरणी जसजसी उशिरा होत जाईल त्याप्रमाणे उत्पादनात मोठी घट होते.

**पेरणीची पद्धत व अंतर:** खरीप मूगाची पेरणी साधारणतः पाभरीने करावी. पेरतांना दोन ओळीमधील अंतर ३० से.मी. व दोन रोपामधील अंतर १० से.मी. ठेवावे.

**बियाण्याचे प्रमाण :** हेक्टरी रोपाची संख्या मोठ्या प्रमाणात राहण्यासाठी हेक्टरी १५ ते २० किलो बियाणे वापरावे.

**बीजप्रक्रिया:** १) पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा पावडर लावावी व त्यानंतर २५ ग्रॅम रायझोबियम जिवाणूची पावडर गुळाच्या थंड पाण्यामध्ये मिसळून लावावी. ट्रायकोकार्डमुळे बुरशीजन्य रोगाचे नियंत्रण होते. रायझोबियममुळे मुळांवरील गाठी वाढवून नत्राची उपलब्धता वाढते.

**खत व्यवस्थापन :** शक्यतो रासायनिक खते ही चांगल्या कुजलेल्या शेणखतांमध्ये मिसळून बियाण्यालगत पेरून द्यावे. त्याकरीता २० किलो नत्र आणि ४० किलो स्फुरद म्हणजेच १०० किलो डी.ए.पी. प्रति हेक्टरी द्यावे.

**आंतरमशागतः** पीक २० ते २५ दिवसाचे असताना पहिली आणि ३०-३५ दिवसाचे असतांना दूसरी कोळपणी करावी. कोळपणी नंतर दोन रोपातील तण काढण्यासाठी लगेच खुरपणी करावी. पीक ३० ते ४५ दिवस तण विरहीत ठेवणे हे उत्पादन वाढीच्या दृष्टिने आवश्यक असते.

**पाणी नियोजन :** मूग पीक हे पावसार येणारे आहे. या पिकाला फुले येतांना आणि शेंगा भरतांना ओल्यावाची कमतरता भासू लागते. अशा परिस्थितीत पाऊस नसेल आणि जमिनीत ओलावा खूपच कमी झाला असेल तर फुले येण्याच्या आणि शेंगा भरण्याच्या काळामध्ये हलके पाणी द्यावे.

**खरीप हंगाम लागवडीकरीता मुगाच्या जाती :**

| जाती | कालावधी (दिवस) | उत्पादन (क्विं./हे) | वैशिष्टे |
|---|---|---|---|
| बी.एम.२००३-२ | ६५-७० | १२-१४ | टपोरे दाणे, लांब शेंगा, भूरी रोग प्रतिकारक्षम, अधिक उत्पादन. |
| बी.एम.२००२-१ | ६५-७० | १२-१४ | टपोरे दाणे, लांब शेंगा, भूरी रोग प्रतिकारक्षम, अधिक उत्पादन, एकाच वेळी पक्व होणारा वाण. |
| उत्कर्षा | ६५-७० | १२-१४ | अधिक उत्पन्न, टपोरे हिरवे दाणे |
| पी.के.व्ही. | ७०-७५ | १०-११ | मध्यम आकाराचे दाणे, एकाच वेळी ग्रीन गोल्ड पक्वता येणारा वाण, भूरी रोग प्रतिकारक्षम . |
| बी.पी.एम.आर.-१४५ | ६५-७० | १२-१४ | भूरी रोग प्रतिकारक्षम, टपोरे हिरवे दाणे, लांब शेंगा |
| वैभव | ७०-७५ | १४-१५ | अधिक उत्पन्न, टपोरे हिरवे दाणे, भूरी रोग प्रतिकारक्षम |

**विद्राव्य खतांची फवारणी :**

* फुलोरा अवस्थेत असतांना २ टक्के युरिया (२० ग्रॅम प्रति लिटर पाणी) फवारावे.
* मूग शेंगा भरत असताना २ टक्के डीएपी (२० ग्रॅम प्रति लिटर पाणी) फवारावे त्यासाठी एकरी १०० लिटर पाणी फवारण्यासाठी २ किलो डीएपी १० लिटर पाण्यात रात्रभर भिजत घालून, सकाळी ते द्रावण ढवळून गाळून घ्यावे. हे द्रावण ९० लिटर पाण्यात मिसळल्यास २ टक्के डी.ए.पी. चे द्रावण तयार होते.